SBTC राज्य रक्त संक्रमण परिषद
State Blood Transfusion Council
महाराष्ट्र राज्य
रविंद्र अनेक्स, ५वा मजला, दिनशॉ वाच्छा रोड, चर्चगेट रिक्लेमेशन, मुंबई-४०००२०
टेलि : २२८३०२१६ फॅक्स : २२८५४९८१ E-Mail: sbtc@mahasbtc.com

क्र.रा.र.सं.प/नाहरकत प्रमाणपत्र अर्ज - तपासणी सुची/परिपत्रक/२०१३/516.
दिनांक : १०/०४/२०१३
09/07/2013

# परिपत्रक

**विषयः-नवीन रक्तपेढी सुरु करणेसाठी तसेच अस्तित्वात असलेल्या रक्तपेढयांना नुतनीकरणासाठी नाहरकत प्रमाणपत्र देणेबाबत.**

औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४५ च्या दिनांक २१/१२/२००५ च्या दुरुस्तीप्रमाणे नवीन रक्तपेढी सुरु करणेसाठी व अस्तित्वात असलेल्या रक्तपेढयांच्या नुतनीकरणासाठी राज्य रक्त संक्रमण परिषदेतर्फे नाहरकत प्रमाणपत्र देण्यात येते.

२. नाहरकत प्रमाणपत्र देण्याची पध्दत सुटसुटीत करण्याच्या दृष्टीने विहित अर्जाचा नमुना व तपासणी सुची तयार करण्याची बाब या कार्यालयाच्या विचाराधीन होती. आता, नवीन रक्तपेढी स्थापन करणेसाठी व अस्तित्वात असलेल्या रक्तपेढंयाच्या नुतनीकरण करणेसाठी दोन वेगवेगळया अर्जांचे नमुने **"नमुना अर्ज अ" (नवीन रक्तपेढी स्थापनेसाठी)** व **"नमुना अर्ज ब" (अस्तित्वात असलेल्या रक्तपेढीचे नुतनीकरण करणेसाठी)** तयार करण्यात आले आहेत व सोबत जोडले आहेत. सदर अर्जांचे नमुने कार्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध राहतील. संबधित अर्जदार विहित अर्जाचा नमुना डाऊनलोड करुन घेऊ शकतील.

३. यापुढे नवीन रक्तपेढी स्थापन करण्यासाठी अथवा रक्तपेढीचे नुतनीकरण करणेसाठी अर्ज संबधित जिल्हयाच्या रक्त संक्रमण अधिकाऱ्यास सादर करावे लागतील. जिल्हा रक्त संक्रमण अधिकारी नवीन स्थापन करण्यात येणाऱ्या रक्तपेढीस अथवा अस्तित्वात असलेल्या रक्तपेढीस वैयक्तिक रित्या भेट देतील व नाहरकत प्रमाणपत्राच्या अर्जात नमुद केलेले मुद्दे तपासतील व त्याप्रमाणे अर्जाच्या शेवटी तपासणी प्रमाणपत्र देतील.

४. तसेच या पुढे नवीन रक्तपेढी स्थापन करण्याच्या अर्जासोबत अथवा अस्तित्वात असलेल्या रक्तपेढीच्या नुतनीकरणासाठी दयावयाच्या अर्जासोबत तपासणी / छाननी साठी सेवा शुल्क म्हणून रक्कम रु. ५००/- (रु. पाचशे फक्त) प्रति रक्तपेढी आकारण्यात येतील. सदर

सेवा शुल्क अर्जासोबत धनाकर्षाव्दारे (Demand Draft) संचालक, राज्य रक्त संक्रमण परिषद, मुंबई यांचे नावे देण्यात यावा.

५. वरील विहित पध्दत दिनांक ०१ एप्रिल, २०१३ पासून रक्तपेढयांना **"नाहरकत प्रमाणपत्र"** देताना अंमलात येईल.

६. सदरचे परिपत्रक राज्य रक्त संक्रमण परिषदेच्या www.mahasbtc.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**संचालक,**
**राज्य रक्त संक्रमण परिषद, मुंबई**

**प्रति,**
१. राज्यातील सर्व रक्तपेढया प्रमुख,
२. सर्व जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय
३. सर्व जिल्हा रक्त संक्रमण अधिकारी

**प्रत सादर,**
आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, मुंबई